नि.फौ.प्र.क्र.४७/२०२३
सरकार वि. प्रेमनाथ व इतर
नि.क्र. ३०

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ शपथेवर साक्ष</u> :–**

माझे नाव : राधिका दयानंद मुगळे
वय ३३ वर्षे, कामधंदा – घरकाम,
रा. किनीनवरे, ता. औसा, जि. लातूर.

**<u>सरकार तर्फे सा.क्र. २ चा शपथेवर सरतपास विदवान सरकारी विधीज्ञ श्री एस.एस. वाघमारे व्दारा शपथेवर सुरु</u> :–**

**१.** फिर्यादी माझे पती आहेत. आरोपी माझे शेत शेजारी असल्यमुळे मी त्यांना ओळखते. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये शेतात भांडण झाले होते. दि.१४. १२.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये भांडण झाले होते. आम्हांला गट क्र. १३८ मध्ये नउ एकर शेती आहे. सदर घटनेच्या दिवशी आरोपी आमच्या शेतामध्ये पाणी देत होते आणि त्यांनी शेड देखील उभारले होते. त्यावेळी फिर्यादीने आरोपींना त्यांच्या शेतात पाणी का देता व त्या ठिकाणी शेड का उभारले आहे असे विचारले असता त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी आरोपी प्रेमनाथ याने स्पीकलरने फिर्यादीच्या छातीवर मारले आणि आरोपी इंदुबाईने विळयाने उजव्या मांडीवर मारले. त्यानंतर फिर्यादीने मला फोन केला त्यावेळी मी घरी होते. मी लगेच शेतात आले आणि आरोपींना विचारले की, का भांडण करतात. त्यावर आरोपीं मला म्हणाले की, तु कोण विचार, तु कोण बोलणार असे म्हणुन शिवीगाळ केली. त्यानंतर मी फिर्यादीला लामजना येथील दवाखान्यात घेवुन गेलो. त्यानंतर किल्लारी पोलीस स्टेशनला गेलो. लामजना येथे फिर्यादीच्या जखमेवर उपचार करण्यात आले.आरोपींनी ज्या हत्यारांनी फिर्यादीस मारहाण केली. ती हत्यारे पाहिल्यास मी ओळखु शकते. आता मला जप्त मुदेमालातील वस्तु एम.ओ. –१ आणि एम.ओ– २ दाखवण्यात आले. सदर जप्त मुदेमालातील हत्यारांनी आरोपींनी फिर्यादीस मारहाण केलेली होती. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकते. आरोपी

प्रेमनाथ आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपींचे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.**

**<u>आरोपी तर्फे कामकाज तहकुबीचा अर्ज अभिलेखावर नाही. आरोपी क्र. १ यांने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याचे नाकारले. सबब आरोपींविरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.</u>**

**उलटतपास नाही,**

**फेरतपास काही नाही.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.08.20 17:32:16 +0530

(एस. एच. नलावडे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. २०.०८.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.08.20 17:32:10 +0530

(एस. एच. नलावडे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. २०.०८.२०२६